ठाणे, शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १३८ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे




अग्रलेख

**केजरीवाल यांची सुटका**

दिल्लीतील मद्य धोरण घोटाळा प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच यासंदर्भातील निकाल दिला. .......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



निवडणुकीपूर्वी मतदारांना आर्थिक मदतीच्या योजना आणून तुम्ही मतदारांना आमिष देताय का ? यावर तुमचे मत ...

# मुंबईचे डबेवाले आणि चर्मकारांना मुंबईत घर मिळणार

**मुंबई: राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सध्या लोकप्रिय घोषणा आणि निर्णयांचा धडाका लावला आहे. यामध्ये शुक्रवारी आणखी एका निर्णयाची भर पडली. त्यानुसार आता मुंबईच्या डबेवाल्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान आवास योजनेतंर्गत म्हाडाकडून मुंबईत डबेवाल्यांसाठी घरे बांधली जाणार आहेत. चर्मकार समाजालाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेतंर्गत मुंबईचे डबेवाले आणि चर्मकार समाजाला मुंबईत ५०० चौरस फुटांचे घर अवघ्या २५ लाख रुपयांमध्ये मिळणार आहे.**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी सभागृहात याबाबतची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर डबेवाल्यांच्या संघटनेने शुक्रवारी सकाळी सह्याद्री अतिथीगृहावर देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत मुंबईतील डबेवाल्यांना मुंबईतच घर देण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून डबेवाल्यांना मुंबईत घर मिळावे, यासाठी पाठपुरावा सुरु होता. अखेर या प्रयत्नांना यश आले आहे. सह्याद्री अतिथीगृहावरील आजच्या बैठकीला नमन बिल्डरचे जयेश शाह, प्रियांका होम्स रियालिटीचे रुद्रप्रताप त्रिपाठी, आ. श्रीकांत भारतीय, डबेवाला संघटनेचे उल्हास मुके, चर्मकार निवारा असोसिएशनचे अशोक गायकवाड महाराज यावेळी उपस्थित होते.



## 25 लाखात 500 चौ.फूट

**मुंबईत डबेवाल्यांना हक्काचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अवघ्या २५ लाख रुपयांमध्ये डबेवाल्यांना ५०० चौरस फुटांचे घर मिळणार आहे. चर्मकार समाजालाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.**

**फडणवीसांच्या उपस्थितीत सामंजस्य करार**

## मुंबईचे डबेवाले आणि चर्मकारांना सरकारचं मोठ्ठं गिफ्ट

### डबेवाल्यांच्या घरांसाठीचा प्रकल्प कसा असणार?

मुंबईचे डबेवाले आणि चर्मकार समाजासाठी एकूण १२ हजार घरांची निर्मिती केली जाणार आहे. या प्रकल्पासाठी प्रियांका होम्स रिलिटीकडून ३० एकर जागा देण्यात आली आहे. नमन बिल्डर्सकडून या प्रकल्पातील घरांचे बांधकाम केले जाणार आहे. नमन बिल्डर्सकडून 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर हे काम केले जाणार आहे. त्यामुळे डबेवाल्यांना ५०० चौरस फुट क्षेत्रफळाचे घर अवघ्या २५ लाखांमध्ये उपलब्ध होणार आहे. येत्या तीन वर्षांमध्ये या घरांचे बांधकाम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे येत्या तीन वर्षांत डबेवाला आणि चर्मकार बंधू यांचे स्वतःच्या घराचं पूर्ण होणार आहे.



## राहुल गांधींच्या आरक्षणविरोधी विधानानंतर भाजपकडून राज्यभर आंदोलन

**मुंबई – काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणासंदर्भात केलेल्या विधानानंतर भारतीय जनता पक्ष चांगलाच आक्रमक झाला आहे. त्याच पार्श्वभूमीवर काल राज्यभरात राहुल गांधी यांच्याविरोधात भाजपतर्फे आंदोलन करण्यात येणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे अकोल्यात तर आशिष शेलार आणि पंकजा मुंडे हे मुंबईत आंदोलन केले. राहुल गांधी यांनी जी भाषा केली जोपर्यंत ते माफी मागत नाही तोवर आमचे आंदोलन सुरु राहील, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. राहुल गांधीनी आपल्या संविधानाचा अपमान केला, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. तसेच छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपा जिल्हा अध्यक्ष शिरीष बोराळकर यांनी गृह निर्माण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत आंदोलन पुकारलं. क्रांतीचौक भागात राहुल गांधी विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तर भाजपा संविधान बदलणार असा प्रचार करणारे स्वत: आज तो बदलण्याची भाषा करत असल्यानं काँग्रेसचा खरा चेहरा देशासमोर आल्याचा आरोप मंत्री अतुल सावे यांनी केलाय.**




काँग्रेसची आरक्षणविरोधी मानसिकता व राहुल गांधींच्या वक्तव्याविरोधात ठाणे भाजपच्यावतीने काँग्रेस हटाओ, आरक्षण बचाओ' आंदोलन करण्यात आले यावेळी आमदार संजय केळकर, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, महिला मोर्चा अध्यक्ष स्नेहा पाटील परिवहन सदस्य विकास पाटील वृषाली वाघुले, श्रुती महाजन, दीपा गावंड, मनोहर सुखधरे, सचिन पाटील , सचिन केदारी आदी मान्यवर उपस्थित होते. (छाया– मनोज सिंग)

### काय म्हणाले होते राहुल गांधी ?

भारतात पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करु, असं राहुल गांधी म्हणाले. अमेरिकेतून राहुल गांधींनी आरक्षणावरुन हे वक्तव्य केलं, मात्र त्यांच्या या वक्तव्यावरून देशात आता रान पेटलं आहे. सत्ताधारी पक्षाने त्यांना यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्र सरकारवर हल्लाबोल करताना, राहुल गांधींनी आरक्षणावरुन भाष्य केलं. पण त्याचवेळी पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार केला जाईल हेही राहुल गांधी म्हणाले. विशेष म्हणजे, ४ महिन्यांआधी झालेल्या लोकसभा निवडणुकीत (पान २ वर)

## कोकणातून परतीचा प्रवास होणार सुखावह

# गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी १४ विशेष रेल्वे....

मुंबई – गणेशोत्सवकाळात गणेशभक्तांसाठी मध्य आणि कोकण रेल्वे खेड – सीएसएमटी, खेड – पनवेल दरम्यान १४ अनारक्षित गणपती विशेष रेल्वे गाड्या चालवण्यात येणार आहेत. या रेल्वे गाड्यांमुळे कोकणातून परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्रमांक ०१०६९ अनारक्षित विशेष सीएसएमटी येथून १२ सप्टेंबर रोजी रात्री ११.३० ० वाजता सुटेल. खेड येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ५.१५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१०७० अनारक्षित विशेष खेड येथून १६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे त्याच दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल. (पान २ वर)



### अनंत चतुर्दशीला रात्रभर सुरू राहणार पश्चिम रेल्वे लोकल

मुंबई – सध्या देशभरात गणेशोत्सव आनंदात, उत्साहात सुरू आहे. मुंबईतीही गणेशोत्सवाचा मोठा उत्साह पहायला मिळत आहे. थोड्याच दिवसात अनंत चतुर्दशी असून मुंबईतील गणेश विसर्जन सोहळा पाहण्यासाठी लाखोंच्या संख्येने नागरिक ठिकठिकाणच्या विसर्जनस्थळी येत असतात. तेच लक्षात घेऊन भाविकांच्या सोयीसाठी रेल्वे विभागाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. पश्चिम रेल्वेच्या वतीने गणेशभक्तांसाठी अनंत चतुर्दशीच्या रात्री लोकलच्या जादा आठ फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबईतील बहुसंख्य सार्वजनिक मंडळांच्या आणि घरगुती गणपतीचे अनंत चतुर्दशीच्या दिवशी विसर्जन होते. त्यामुळे विसर्जन सोहळ्यानिमित्त गिरगाव, दादर, जुहू आदी चौपाट्यांवर भाविकांची प्रचंड गर्दी होते. भाविकांची हीच मोठी गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने मंगळवारी मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत अप आणि डाऊन मार्गावर प्रत्येकी चार लोकल चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विसर्जनासाठी बाहेर पडणाऱ्या भाविकांना रात्री उशीरादेखील घरी परतता येणार आहे.

## थोडक्यात घडामोडी

### उपराष्ट्रपती श्री.जगदीप धनखड यांच्या हस्ते संपन्न होणार संविधान मंदिर लोकार्पण सोहळा

ठाणे – सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारताच्या संविधानातून प्राप्त होत असल्यामुळे, लोकशाही दिनाचे औचित्य साधून कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालाच्या अधिपत्याखालील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे द्वारे संविधान मंदिर लोकार्पण सोहळा (आभासी पद्धतीने) दि.१५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपराष्ट्रपती श्री.जगदीप धनखड यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे संपन्न होणार आहे. याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगल प्रभात लोढा यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ऑनलाईन पध्दतीने एकाच वेळी (पान २ वर)

## कळवा खाडीत उडी घेऊन ३१ वर्षीय महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न; नागरिकांनी दिले पोलिसांच्या ताब्यात

ठाणे – ठाण्याच्या खारटन रोडवर राहणाऱ्या ३१ वर्षीय महिला आरती सनी बागडी यांनी कळवा ब्रिजवरून खाडीत उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सदरची घटना शुक्रवारी(ता – १३ सप्टेंबर) रोजी ९–२७ वाजण्याच्या सुमारास घडली. स्थानिक नागरिकांनी महिलेला सुखरूप बाहेर काढून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

(छाया – मनोज सिंग)

आत्महत्येचा प्रयत्न करणारी ३१ वर्षीय महिला आरती सनी बागडी हिने शुक्रवारी सकाळी कळवा ब्रीज वरून कळवा खाडीमध्ये उडी मारली होती. सदर घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी



तिला तिला खाडीतून सुखरूप काढले. तोपर्यंत घटनास्थळी कळवा पोलीस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान पोहचले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने महिलेला सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर महिलेला कळवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान महिलेने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. याबाबत माहिती मिळू शकली नाही.



सालाबादाप्रमाणे यंदाही ठाण्यातील कोपरी विसर्जन घाट येथे, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून अन्नसेवा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शिवसेना कोपरी विभाग आणि मेहेंदीपूर बालाजी मित्र मंडळ यांच्या संयुक्त संयोगाने कोपरी मिठाबंदर विसर्जन घाट येथे महाप्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात येत असतो. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी दरवर्षी गणेशभक्तांच्या उत्तम प्रतिसाद लाभत असतो. गौरी गणपती विसर्जन आणि अनंत चतुर्थीच्या दिवशी देखील महाप्रसादाचा स्टॉल लावण्यात येणार असल्याची माहिती कोटवानी यांनी दिली.




ठाणे, कोलशेत विसर्जन घाटावर गणेशाचं विसर्जन करण्यासाठी जाणाऱ्या गणेश भक्तांसाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने सरबत वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ठाणे शहराचे आमदार संजय केळकर परिवहन समिती सदस्य विकास पाटील ओबीसी युवा मोर्चाचे अमित पाटील भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष सुरज दळवी जैन समाजाचे अध्यक्ष राकेश जैन आधी मान कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. (छाया – मनोज सिंह)

## ठाणे भाजपमध्ये पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांचा राजीनामा सत्र सुरू

ठाणे – येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या त्रीसुत्री सरकार विरोधकांना शिंगावरून घेवून निवडणुकीला सामोरे जाताना पाहायला मिळत असताना ठाणे भाजपमध्ये पदाधिकारी तथा कार्यकर्त्यांचा राजीनामा देण्याचे सत्र सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. भारतीय जनता पार्टी वागळे विभाग, ठाणे येथील २८ पदाधिकाऱ्यांचे स्वमर्जीने राजीनामे दिले आहे, अशी माहिती भाजप, वागळे विभाग सरचिटणीस– राजितराम तिवारी, सचिव –उमेश भोसले, उपाध्यक्ष – अनिल देडिया यांनी आमच्या प्रतिनिधी बोलताना दिली. त्यांनी याबाबत वरिष्ठांना पत्र व्यवहार करून त्यांची कैफियत मांडली असल्याचे त्यांनी सांगितले.

याविषयी त्यांना अधिक माहिती विचारली असताना त्यांनी सांगितले की, गेल्या १५ वर्षांपासून पक्षाच्या झेंड्याखाली जनसेवा ईनामे इतबारे करीत असतो. पक्षाचे कार्यक्रम व सण साजरा करताना आमच्या स्वखर्चाने बॅनर्स, फोटो, साहित्य, सामुग्रीचे आयोजन करीत असतो. तसेच आपल्या पक्षाच्या सभा व मिटींग आम्ही स्वखर्चाने पार पाडत आहोत. पक्षावरील निष्ठा कायम ठेवत पक्षा वाढीसाठी रात्रंदिवस झटतो. परंतु स्थानिक नेते आमच्या कार्याचा मोबदला म्हणून पक्षात आलेल्या नवीन पदाधिकाऱ्यांना जास्त महत्व देत असून पक्षामार्फत कुठलाही आमच्या पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांचे वैयक्तिक अथवा सामाजिक काम केले जात नाही. अपमान, हेंडसाळ, दुजाभाव देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आम्ही राजीनामा देत आहोत.

त्यामुळे वर्षानुवर्षे जी जनता आम्हाला ओळखते त्यांच्या विश्वासाप्रती आम्ही खरे उतरत नसल्यामुळे आमच्या प्रभागामध्ये आमचा प्रभाव तसेच पक्षाची प्रतिमा कमी होताना दिसत आहे. नविन नियुक्ती केलेले पदाधिकारी यांची संपूर्ण माहिती जाणून न घेता त्यांना मोठ्या प्रमाणात पक्षामार्फत महत्व दिले जात असून त्यांची कामे होत आहे. हे सर्व बघून पक्षातील कार्यकर्ते व महिला कार्यकर्ते कमालीचे नाराज आहे. तसेच ठाणे भाजपमधील काही वरिष्ठ व कनिष्ठ पदाधिकारी, नेत्यांच्या मनमानी कारभार कंटाळून आम्ही राजीनामा देण्याचे ठरविले आहे. आता पर्यंत आमच्या सह २८ पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी राजीनामा दिला असून यापुढेही अधिक कार्यकर्ते राजीनामा देणार आहेत.

याबाबत पक्ष श्रेष्ठी म्हणून महाराष्ट्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले यांच्या पत्र व्यवहार करून कैफियत मांडली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आता भाजप श्रेष्ठी त्यांच्या कैफियत ऐकूण त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतील का? त्यांना राजीनामा देण्याचापासून थांबवता का? हे पुढे पहावे लागेल.

### रोख रक्कम बाळगण्याची गरज नाही; आता शुल्क भरणा झाले सोपे

## जिल्हा परिषद ठाणे मार्फत पहिल्यांदाच पेमेंट गेटवेचा वापर होणार

**जिल्हा परिषदे मार्फत सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांना बांधकाम विभागातील १० लाखाच्या आतील विकास काम विनास्पर्धा ऑनलाईन लॉटरी पद्धतीने बी. जे. हायस्कूल येथे (दि.१३ सप्टेंबर) आज वाटप करण्यात आले. सन २०२४–२५ या वर्षातील १६६ विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.**

यावेळी जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी तंत्रज्ञानाची

### तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामांना गती मिळणार, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना विश्वास

जोड घेऊन आज विकास कामाचे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आले. यामार्फत काम वाटप आणि आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे करण्याच्या उद्देशाने कामकाज करण्यात आले आहे. पुढील कामवाटप नियोजन ऑनलाईन लॉटरी पद्धतीने फेसबुक, युट्यूब दूरदृश्यप्रणाली द्वारे देखील (लाईव्ह) करण्यात येईल. विकास कामांना गती मिळण्यासाठी सुरूवात उत्तम





झाली असून काम देखील उत्तम पद्धतीने व्हावी अशी अपेक्षा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी व्यक्त केली. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील

# संपादकीय...

संपादक–चंद्रकांत भोईटे

## केजरीवाल यांची सुटका

दिल्लीतील मद्य धोरण घोटाळा प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच यासंदर्भातील निकाल दिला. गेल्या काही महिन्यांपासून अरविंद केजरीवाल तुरुंगात आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे केजरीवाल नुकतेच तिहार तुरुंगातून बाहेर येण्याची शक्यता आहे. १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर केजरीवालांचा जामीन मंजूर करण्यात आला आहे. केजरीवाल यांचा जामीन रद्द करण्यासाठी सीबीआयने वेगळे प्रयत्न केले आहेत का, असा आरोप न्यायालयाने राष्ट्रीय फळास यंत्रणेवर केला आहे.दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जामीन अर्जासह सीबीआयच्या अटकेलाही आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती भूइंया यांच्या खंडपीठाने केजरीवाल यांचा जामीन मंजूर केला. मात्र यावेळी सीबीआयने केजरीवालांना केलेली अटक योग्य होती की नाही याबाबत दोन्ही न्यायमूर्तींची मते वेगवेगळी होती. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी केजरीवालांच्या अटकेचे समर्थन केले तर न्यायमूर्ती भुइंया यांनी मात्र या अटकेवर काही प्रश्न उपस्थित केले. तसेच सीबीआयने ज्या वेळी ही अटक केली त्या वेळेवर न्यायमूर्तींनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणाले, सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या अटकेनंतर केजरीवालांचा जामीन मंजूर झालेला असताना तो जामीन रोखण्यासाठी ही अटक केली होती का? न्यायमूर्ती भुइंया म्हणाले, सीबीआयला सिद्ध करावे लागेल की ते पिंजऱ्यातला पोपट नाहीत. चुकीच्या पद्धतीने कोणालाही अटक होऊ नये यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न त्यांनी करायला हवेत. देशातील नागरिकांच्या मनातील अनेक धारणा संस्थांची प्रतिमा बदलू शकतात, वेगळी प्रतिमा निर्माण करू शकतात. त्यामुळे सीबीआय बंद पिंजऱ्यातील पोपट असल्याचा लोकांचा समज त्यांना दूर करावा लागेल. सीबीआयने सीझरच्या पत्नीप्रमाणे संशयाच्या भोवऱ्यातून बाहेर पडायला हवे. केजरीवाल यांच्यावर मद्य धोरण घोटाळा प्रकरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करत त्यांना सीबीआयने त्यांना अटक केली होती. यानंतर केजरीवाल यांनी या अटकेला आव्हान देणारी आणि जामीन मिळण्यासंदर्भातील अशा दोन स्वतंत्र याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या होत्या. या याचिकांवर नुकतीच सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ५ सप्टेंबरला झालेल्या सुनावणीदरम्यान याचिकेवरील निकाल राखीव ठेवला होता. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर केला आहे.

केजरीवाल यांना ईडीने अटक केल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या काळातही त्यांना जामीन मंजूर होऊ नये यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणांनी आटापिटा केला होता. अखेर केजरीवाल निर्दोष सुटले आहेत, असे दिसते. केंद्र सरकारने तपास यंत्रणांचा वापर पारदर्शी पद्धतीने केला पाहिजे असे वाटते. तपास यंत्रणा कुणाच्या हातचे बाहुले नाहीत, ही प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न तपास यंत्रणांनी करायला हवा.

# इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ऑफलाईन अर्ज करण्याचे आवाहन

ठाणे – देशात सर्वधर्मियांचीही मोठी तीर्थस्थळे आहेत. जिथे पुण्यकर्म म्हणून आयुष्यात एकदा तरी जाण्याचे बहुतांश ज्येष्ठ नागरिकांचे स्वप्न असते. ही बाब विचारात घेवून सर्वसामान्य ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जावून मनःशांती तसेच अध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे, यासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्वधर्मियांमधील ६० वर्षे व त्यावरील वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची मुख्यमंत्री–तीर्थ दर्शन योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील शासन निर्णय क्र. ज्येष्ठना–२०२४/ प्र.क्र.१८९/सामासु, दि.१४जुलै २०२४ नुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेतून प्रति व्यक्ती ३००००/– रुपये खर्चाची कमाल मर्यादा असून यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ. बाबींचा समावेश असेल. भारतातील ७३ व राज्यातील ६६ निर्धारित स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता योजनेतून एकवेळ लाभ घेता येईल. या योजनेतून पात्र प्रवाशांची निवड ही पालकमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे करण्यात येईल.

या योजनेचे ऑनलाईन पोर्टल सद्य:स्थितीत सुरु नसल्याने योजनेतून निवड होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ऑफलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. अर्ज करताना आधारकार्ड, रेशनकार्ड, अधिवासबाबत पुरावा, उत्पन्न दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, मोबाईल क्रमांक, योजनेच्या अटी पालन करणेबाबत हमीपत्र इ. कागदपत्रे आवश्यक राहतील.

योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी शासन स्तरावरून पोर्टल सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तत्पूर्वी योजनेच्या अनुषंगाने इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी कागदपत्रांची पूर्तता आपल्यास्तरावर करावी व ऑफलाईन अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण, ४ था मजला, सामाजिक न्याय भवन, दत्तवाडी, स्वामी समर्थ मठासमोर, कळवा, ठाणे – ४००६०५ येथे सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

## काल भाजपकडून राज्यभर आंदोलन

**(पान १ वरून)** संविधानाची प्रत दाखवून राहुल गांधी, मोदींवर आरक्षण संपवतील असा आरोप करत होते.

पण आता आरक्षण संपवण्याच्या वक्तव्यावरुन आता भाजपचे अनेक नेते,फडणवीस, शिंदेही राहुल गांधी यांच्यावर तुटून पडले आहेत. आरक्षण विरोधी काँग्रेसचा चेहरा समोर आला असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मतांसाठी आरक्षणावरुन कसा खोटा नॅरेटिव्ह केला हे राहुल गांधींच्या वक्तव्यातून दिसलं असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. तर काल भाजप आमदार प्रसाद लाड यांनीही राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर टीका केली. लोकसभा निवडणुकीत नरेटिव्ह सेट करणाऱ्या काँग्रेसची खरी आणि संविधान विरोधी भूमिका राहुल गांधींच्या तोंडून आता समोर आली आहे, असे टीकास्त्र लाड यांनी सोडले.

एकंदरच राहुल गांधी यांच्या आरक्षणावरील वक्तव्यारून मोठा वाद होण्याची शक्यता असून आज राज्यभरातील आंदोलनाद्वारे भाजप त्यांच्याविरोधात रान उठवण्याची शक्यता आहे.

## गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी १४ विशेष रेल्वे...

**(पान १ वरून)** या रेल्वे गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, सापे वामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखावटी आणि कळंबणी बुद्रुक येथे थांबा देण्यात येणार आहे.

तर अनारक्षित विशेष गाडी पनवेल येथून १३, १४, १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सुटेल आणि खेड येथे त्याच दिवशी दुपारी २.४५ वाजता पोहोचेल

परतीसाठी अनारक्षित रेल्वे १३, १४, १५,सप्टेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजता सुटेल आणि पनवेल येथे त्याच दिवशी रात्री ८.३० वाजता पोहोचेल.

तसेच अनारक्षित विशेष पनवेल येथून १३, १४, आणि १५ सप्टेंबर रोजी रात्री ९.१० वाजता सुटेल. तर अनारक्षित विशेष १३, १४, १५ सप्टेंबर रोजी खेड येथून सकाळी ६वाजता सुटेल आणि पनवेल येथे त्याच दिवशी सकाळी १० वाजता पोहोचेल.

## जिल्हा परिषद ठाणे मार्फत पहिल्यांदाच पेमेंट गेटवेचा वापर होणार

**(पान १ वरून)** विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून कामवाटप, वेळेची बचत, पारदर्शकता आणण्यासाठी मोलाचं आहे. कामवाटप ऑनलाईन पद्धतीने राबवणारी महाराष्ट्रातील ७ वी जिल्हा परिषद असून पेमेंट गेटवे वापर करणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद ठाणे आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामांना गती मिळणार असून लॉटरी पद्धतीने काम मिळालेल्या सर्वांचे अभिनंदन, असे प्रास्ताविक करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण, उप कार्यकारी अधिकारी सुनिल बच्छाव, आरेखक संजीव यशवंत, बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापूर्वी हि प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने कामाच्या चिठ्ठया काढून लॉटरी पद्धतीन राबविण्यात येत होती. कामांचे विभाजन योग्य पध्दतीने करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून १ कोटी रक्कमेची काम ठेकेदाराने पुर्ण केल्यानंतर पुढील काम नवीन ठेकेदारास देण्यात येणार आहे. शज्ञगुरींर्हिरपशू.ळिप या संकेतस्थळावर विकास काम प्राप्त करण्यासाठी ८६६ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते.

पुर्वीची ऑफलाईन प्रक्रिया राबवितांना कागदपत्रांचा वापर जास्त प्रमाणत होत होता तसेच जमा झालेली रक्कम चलनाद्वारे बँकेत भरावी लागत होती. आता ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणारी कामवाटप प्रक्रियेत स्टेशनरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार असून निविदा रक्कमेचा भरणा हा संबधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांच्या बँक खात्यातून ऑनलाईन पद्धतीने जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात जमा होणार आहे. तसेच ऑनलाईन सॉफ्टवेअर द्वारे विकास कामांचे वाटप झाले असून कामकाज वेगवान तंत्रज्ञान युक्त व पारदर्शक होणार आहे. यामुळे खऱ्या अर्थाने ठाणे जिल्हा परिषद हायटेक झालेली आहे अशी माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण यांनी दिली.

ही कामवाटप प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवली जात असल्याने जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर कामगार सहकारी संस्थेचे पदाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

ऑनलाईन लॉटरी पद्धतीने काम मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेचे आभार व्यक्त करतो. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे, सद्यस्थिती, पुढील कामाचे नियोजन करण्यासाठी सुलभता निर्माण झाली आहे. – मजूर संस्थेचे पदाधिकारी सिताराम भावार्थे

## उपराष्ट्रपती श्री.जगदीप धनखड यांच्या हस्ते संपन्न होणार संविधान मंदिर लोकार्पण सोहळा

**(पान १ वरून)** हा कार्यक्रम आयोजित केला जाणार असून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे (वागळे इस्टेट) येथील कार्यक्रमास लोकसभा खासदार ठाणे नरेश म्हस्के यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी आजी–माजी विद्यार्थी, पालक व संविधानाची जाण असणारे समाजसेवक व स्थानिक नागरिक यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या प्राचार्य श्रीमती स्मिता माने यांनी केले आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

घनकचरा व्यवस्थापन विभाग

निविदा सूचना

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत "स्वच्छता ही सेवा अभियान २०२४" करिता CAPS खरेदी करणेकरिता ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.सदरच्या कामाचे निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच्या www.mahatender.gov.in या वेबसाईटवर दि.१४/०९/२०२४ ते दि.२०/०९/२०२४ पर्यंत १५.०० वाजेपर्यंत उपलब्ध असून निविदा ई-टेंडरिंग पध्दतीने दि. २०/०९/२०२४ रोजी सांयकाळी १५.०० वाजेपर्यंत सादर करावीत. प्राप्त निविदा दि.२०/०९/२०२४ रोजी १६.०० वाजता उघडण्यात येतील. प्राप्त झालेली कोणतीही निविदा पूर्णत: अथवा अंशत: स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.

ठामपा/पिआरओ/घ.क.व्य/४९४/२०२४-२५
दि: १३.०९.२०२४
**Pls visit our official web-site www.thanecity.gov.in**

**सही/-**
उपआयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
ठाणे महानगरपालिका, ठाणे

# भिवंडी गौरी गणपती विसर्जन उत्साहाने तर पालिका प्रशासनातर्फे चांगली व्यवस्था

भिवंडी गौरी गणपती विसर्जन फार उत्साहात करण्यात आले शहरातील मुख्य विसर्जन घाटांवर प्रभाग समिती क्रमांक एक अंतर्गत सर्व घाटांवर १०८९ घरगुती, सार्वजनिक ३४, गौरी १०५, कृत्रिम तलावात पाच, तर प्रभाग समिती क्रमांक दोन अंतर्गत भादवड घाटावर ८४७ घरगुती, २० सार्वजनिक, ४५ गौरी आणि कृत्रिम तलावात १५, प्रभाग समिती क्रमांक तीन अंतर्गत वराळदेवी परिसरात घरगुती २७५२, सार्वजनिक ६९, गौरी ११, कृत्रिम तलाव ३२, प्रभाग समिती क्रमांक चार अंतर्गत घरगुती ४०३ सार्वजानिक ६, कृत्रिम तलावात सहा, समिती क्रमांक पाच येथे दोन कृत्रिम तलाव तयार करण्यात होते त्यामध्ये २७ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. सर्व विसर्जन घाटांवर पालिका आयुक्त अजय वैद्य, तसेच उपायुक्त नयना ससाणे यांनी भेटी देऊन सर्व घाटावरील विसर्जनाचे पाहणी केली. सर्व घाटांवर पालिकेतर्फे वाहन वाहनाचे चांगली सोय करण्यात आली होती, जीवन रक्षक पथक त्याचबरोबर क्रेनची व्यवस्था, तराफे तसेच सर्व घाटांवर नियंत्रण कक्ष तयार करण्यात आले होते. पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी स्वत: सर्व घाटांवर भेट देऊन प्रत्यक्ष विसर्जनाची पाहणी केली व गणेश भक्तांना कोणत्या प्रकारची अडचणी येणार नाहीत या



कामी सर्व प्रभाग अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख यांना सूचना दिल्या. एकूण शहरात एकूण घरगुती ५१४४ सार्वजनिक १२९, गौरी १६५ अशा गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. ८५ गणेश भक्ताने कृत्रिम तलावाचा वापर केला.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

ठाणे – महाराष्ट्र शासनाने राज्यातील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयामध्ये व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक, पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या व वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळाला नसल्यास ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेसाठी शासनाने यापूर्वी असलेली दि.२० ऑगस्ट २०२४ पर्यंतची मुदत वाढविण्यात आली असून नवीन मुदतवाढ ही उच्च शिक्षणाच्या द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने अर्ज दि.३० सप्टेंबर २०२४ पर्यंत तसेच प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत देण्यात आली आहे.

ही योजना इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू आहे. या योजनेमध्ये विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी मध्ये किमान ६० टक्के गुण आवश्यक आहेत तसेच विद्यार्थी हा वसतीगृह प्रवेशास पात्र असावा, विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा, पालकाचे उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे, विद्यार्थ्याचे कमाल वय ३० वर्षापेक्षा अधिक नसावे, विद्यार्थी हा कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा, महाविद्यालयातील विद्यार्थ्याची उपस्थिती किमान ७५ टक्के असावी आदी प्रमुख निकष/पात्रता आहे.

या योजनेकीरता पात्र विद्यार्थ्यांनी परिपूर्ण कागदपत्रांसह त्यांचे ऑफलाईन अर्ज सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ४ था मजला, दत्तवाडी, खारेगाव, कळवा, जि. ठाणे. ४००६०५ येथे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

☆ मिळकट नोटीस
☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस
☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा
☆ कामगार न्यायालय नोटीस

- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट

***DISCLAIMER:** Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/12078/18/24
Inquiry/case No. : ACC/I/717/2024
Name of the Trust : डॉ. अनिलकुमार बळीराम गायकवाड प्रतिष्ठान ठाणे तालुका जिल्हा ठाणे
**Address of the Trust :** ठाणे तालुका जिल्हा ठाणे, ठाणे तालुका जिल्हा ठाणे, तालुका जिल्हा ठाणे, ठाणे, ठाणे, ठाणे.
**Name of the Applicant :** विश्वजीत अनिलकुमार गायकवाड

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Member fees and donation | 5000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 5000/- Only
(In Words Rs. Five Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 06/09/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**जाहिर ई – निविदा सुचना**

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/ ६५२४/प्र.क्र. २८/३८८३ /२०२४ दिनांक :– १३/०९/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Centeral Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी २ शतमान पद्धतीनुसार जाहिर ई–निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/३६१/ २०२३–२४ | पनवेल महानगरपालिकेसाठी शिक्षण, सीएसआर, पीपीपी आणि पर्यटन क्षेत्रातील धोरणात्मक प्रकल्प विकसित करणेनिविदा प्रक्रिया व्यवस्थापन व अमृत अभियानांतर्गत हँड होल्डींग सपोर्ट प्रधान करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे बाबत. (3rd Call) | ३,३०,००,०००/– |

या कामाच्या ई– निविदे बाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१४/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.४४५/४४६/२०२४
दिनांक :– १३/०९/२०२४

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे – ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२–२८१९२८२८/२८१९३०८७

जा.क्र. मनपा/आस्था /१८४३/२०२४–२५ दि. १३/०९/२०२४

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील शिक्षण विभागामधील माध्यमिक वर्गासाठी इंग्रजी, गणित, विज्ञान, मराठी व समाजशास्त्र तसेच उर्दु भाषा वर्गासाठी ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक उपलब्ध करून घेणेबाबत.

।। जाहीर सूचना ।।

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील मिरा भाईंदर महानगरपालितील शिक्षण विभागामधील माध्यमिक वर्गासाठी इंग्रजी, गणित / विज्ञान, मराठी व समाजशास्त्र तसेच उर्दु भाषा वर्गासाठी ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक (माध्यमिक) उपलब्ध करुन घेणेबाबत तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधन तत्वावर १० महिन्याच्या कालावधीकरीता शिक्षक करार पध्दतीने भरावयाचे असल्याने पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

महानगरपालिकेच्या शाळांसाठी ठोक मानधनावर माध्यमिक शिक्षकांच्या १७ पदांकरीता शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे निवड करण्यात येणार आहे. त्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पूर्ण करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवारांनी मा. स्थायी समिती सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) येथे दि.२४/०९/२०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबतची सविस्तर जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

जा.क्र.मनपा/मावज/E–२८३७५४३/२०२४–२५
दि. १३/०९/२०२४
(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

स्वा./–
(संजय दोंदे)
उप–आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

## भारतीय रेल्वे

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/




■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

## एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

■ पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
■ अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
■ शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्त्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
■ परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## युनियन बँक ऑफ इंडिया

■ पद क्र. अप्रेंटिस
■ शैक्षणिक पात्रता: पदवीधर
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 800/- SC/ST: 600/-, PWD:400/-
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत वेबसाईट https://www.unionbankofindia.co.in/

## इंडियन ओव्हरसीज बँक

■ पद क्र.
अप्रेंटिस
■ पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 944/- SC/ST: 708/-, PWD:472/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.iob.in/

## उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

■ पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-खत ३५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
■ फी : ५९/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
■ https://konkanrailway.com/

# अखिल भारतीय अभियंतांचा मानबिंदू – सर एम.विश्वेश्वरय्या

अभियांत्रिकी क्षेत्रात रोल मॉडेल ठरलेले विश्वविख्यात अभियंता भारतरत्न सर एम.विश्वश्वरेय्या यांचा १५ सप्टेंबर हा जयंती दिवस केंद्र सरकारद्वारे साऱ्या देशात ✻अभियंता दिन✻ म्हणून साजरा केला जातो,म्हणजे हीच त्यांच्या अभियांत्रिकी क्षेत्रात दिलेल्या महान योगदानाची फलश्रुती होय.

विश्वश्वरेय्या यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकच्या कोलार जिल्ह्यातील मुद्देनहल्ली या छोट्याश्या गावात झाला अन् जणू अभियांत्रिकी क्षेत्रात क्रांती घडवून आणणारा महान अभियंताच उदयास आला. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीनिवास शास्त्री अन् आईचे वेंकटलक्ष्म्मा. त्यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते.इंजिनिअरिंग शिक्षणासाठी काही काळ त्यांचे पुणे-मुंबई येथे वास्तव्य होते.मुंबई विद्यापीठात त्यांनी एल.सी.ई.पदवी संपादन केली.विश्वेश्वरय्या यांनी म्हैसूर संस्थानात काही वर्षे दिवान पद भूषविले.अभियांत्रिकी विषयावर आधारित कन्सट्रकटिंग इंडिया आणि प्लॅन्ड इकॉनॉमी ऑफ इंडिया हे दोन ग्रंथ लिहिले,जे नवोदित अभियंत्यांना हमखास पथदर्शक ठरतील,हे योजना हे प्रमुख प्रकल्प विश्वेश्वरय्या यांच्या नावलौकिकचे मानबिंदू ठरले.सर्वात मोठी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे म्हैसुरचा केआरएस हा आशिया खंडातला सर्वात मोठा ब्रीज गणला गेला,जो विश्वेश्वरय्या यांच्या बुद्धिमत्तेचा सर्वोच्च मानबिंदू ठरला. सृष्टीसौंदर्यानं नटलेलं मनमोहक असं वृंदावन गार्डन हेदेखील आशियातील सर्वोत्कृष्ट उद्यान म्हटलं जातं.ही पण त्यांचीच निर्मिती आहे.

सन १९०७ मध्ये सरकारी नोकरीतून सेवानिवृत्ती स्वीकारल्यावर हैद्राबादच्या निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागार पदी नियुक्ती केली. विश्वेश्वरय्या यांनी हैद्राबादमधील दोन नद्यांवर धरणे बांधून हैद्राबाद शहर पूरमुक्त केलं.त्याचप्रमाणे म्हैसूरच्या राजाने देखील त्यांची मुख्य अभियंता पदावर नियुक्ती केली.तेथेही त्यांनी कृष्णराज सागर धरण अन् वृंदावन गार्डन उभारले.पाण्याचा अपव्यय टाळून त्याचा पुरेपूर वापर करता यावा, या उद्देशाने उभारलेल्या ब्लॉक सिस्टीमचे ते जनकही म्हटले गेले. तत्कालिन मुंबई सरकारमध्ये अभियंता असताना त्यांनी खडकवासला धरणसाठी अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.ते जरी आज आपल्यात नसले,तरी राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करण्याचा विक्रम त्यांनी केला,याबद्दल त्यांना प्रगत भारतीय अर्थव्यवस्थेचे जनक म्हणून आजही त्यांची जनमानसात ओळख टिकून आहे.

महत्वाचे म्हणजे विश्वेश्वरय्या हे जगातले असे एकच अभियंता आहेत,जे इंजिनिअरिंग,ऊर्जा,कृषी, उद्योग,एरिगेशन,शिक्षण, पूररोधक व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रातल्या प्रकल्पांचे शिल्पकार ठरले.या पार्श्वभूमीवर त्यांना १९९५ साली ✻भारतरत्न✻ हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.अत: सर एम. विश्वेश्वरय्या यांना मराठी जनमानसाचा त्रिवार मानाचा मुजरा!

देशाचा विकास हाच केंद्रबिंदू मानून आपली अर्थव्यवस्था अधिकाधिक सक्षम करण्यावर भर देणे,ही काळाची गरज असल्याचा पथदर्शक संदेश त्यांनी तमाम भारतीय अभियंतांना दिला आहे.अत: विश्वेश्वरय्या यांच्या अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगत ध्येयधोरणांना आत्मसात करून, त्यांच्या पावलावर निश्चित.

इंजिनियरिंगची परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण केल्याबद्दल विश्वेश्वरय्या यांची गुणवत्तेच्या निकषावर तत्कालिन मुंबई सरकारने त्यांची कुठलीही परीक्षा न घेता,थेट सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता पदी नियुक्ती केली,हीच खरी त्यांच्या बुद्धिमत्तेची पावती म्हणावी.त्यानंतर त्यांच्या प्रगतीचा वेग सातत्याने वाढतच गेला.सन १८९५ ते १९०५ या दशकात त्यांनी देशातील महत्वाच्या प्रकल्प उभारणीत भरीव योगदान दिलं.मध्य प्रदेशातील दिग्रा ड्याम; कर्नाटकचा कृष्णराज
सागर धरण;हैद्राबाद येथील पूरसंरक्षक योजना;मुंबईची ब्लॉक सिस्टीम एरिगेशन; बिहार येथील रेल्वे ब्रीज;ओरिसातील पाणी पुरवठा केली.अशा गेटची उभारणी भारतात प्रथमच झाली होती.त्याचे मानकरी विश्वेश्वरय्या हेच होते. या अभूतपूर्व संशोधनाचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे पडले.


अंधश्रद्धा,मूर्तिपूजा यावर त्यांचा विश्वास नव्हता.त्यांच्या मते मानवात देवाचं वास्तव्य आहे.मानव सेवा हीच ईश्वर सेवा,असे त्यांचे ठाम मत होते. थोडक्यात त्यांचा शब्द सर्वच क्षेत्रात प्रमाण मानला जायचा.ते जसे बोलायचे,तशीच त्यांची कृती असायची.तात्पर्य,ते शब्दाचे पक्के होते.विश्वेश्वरय्या हे भारतातील पहिले सिव्हिल इंजिनियर म्हणून गणले गेले.अशा थोर अभियंत्याचे १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ वर्षी दुःखद निधन झाले.भारतीय अर्थव्यवस्था मजबूत पाऊल टाकत बांधकाम, ऊर्जा, जलसिंचन, विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, उद्योग आदी तत्सम क्षेत्रांत तसेच खाजगी क्षेत्रात कार्यरत असलेल्या नवोदित अभियंत्यांनी पुढील वाटचाल करून देशाचा शाश्वत विकास साधावा.राज्या-राज्यातील नागरिकांना स्वच्छ पाणी, पुरेशी वीज, प्रशस्त रस्ते, दौलदार घरकुलं उपलब्ध होण्यासाठी अभियंत्यांनी प्रयत्नांची शिकस्त करावी,म्हणजे हीच खरी महान अभियंता सर मोक्षगुंडम विश्वश्वरेय्या यांना आदरांजली ठरेल.

राज्यासह देशातल्या तमाम अभियंत्यांना अभियंता दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

लेखक-रणवीरसिंह राजपूत

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करताना

# ७०० हून अधिक शाडू मातीच्या श्रीगणेश गौरी मूर्तींचे विसर्जन



भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पारंपारिक विसर्जन स्थळांसोबत निर्माण करण्यात आलेल्या ४ कृत्रिम विसर्जन स्थळांवर तसेच नैसर्गिक तलाव/समुद्रात श्रीगणराय २४२३ व गौरीच्या २०६ मूर्तींचे विसर्जन व्यवस्थितरित्या संपन्न झाले. महानगरपालिकेच्या वतीने मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार सर्वच ठिकाणी करण्यात आलेल्या विसर्जन व्यवस्थेत दीड दिवसाचा विसर्जन सोहळा शांतरितीने पार पडला.

गौरी गणपती विसर्जन प्रसंगी नैसर्गिक तलाव/कृत्रिम तलाव/समुद्र/खाडी येथे एकूण २४२३ श्रीगणेश मूर्तींना व २०६ गौरी मूर्तींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. प्रभाग क्रमांक ०१ मध्ये नैसर्गिक तलाव/समुद्रात एकूण २७३ गौरी गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. प्रभाग क्रमांक ०२ मध्ये नैसर्गिक तलाव/समुद्रात एकूण २४९ गौरी गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. प्रभाग क्रमांक ०३ मध्ये नैसर्गिक तलाव/समुद्रात एकूण ४७५ गौरी गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. प्रभाग क्रमांक ०४ मध्ये नैसर्गिक तलाव/समुद्रात व कृत्रिम तलावात एकूण ७४३ गौरी गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. प्रभाग क्रमांक ०५ मध्ये कृत्रिम तलावात एकूण १९ गौरी गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. प्रभाग क्रमांक ०६ मध्ये नैसर्गिक तलावात एकूण ८७० गौरी गणपती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींसाठी मिरा-भाईंदर महापालिकेमार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले होते. महापालिकेस सहकार्य करताना शहरातील सुजाण नागरिकांनी ७०० हून अधिक शाडू मातीच्या श्रीगणेशाचे आणि गौरी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार महापालिका सहाय्यक आयुक्त व अधिकारी यांनी विसर्जन स्थळी पाहणी केली. सर्वच विसर्जनस्थळांवर सुरक्षेच्या दृष्टीने बांबूंचे बॅरेकेटींग करण्यात आले होते. अग्निशमन सेवक, महानगरपालिका स्वयंसेवक यांच्यासह वैद्यकीय आरोग्य व सार्वजनिक आरोग्य सेवाही कार्यरत होते. सर्व विसर्जन स्थळांवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलीस यंत्रणा तसेच सीसीटीव्ही यंत्रणा अत्यंत सतर्कतेने कार्यरत होती. यापुढील काळातील श्रीगणेश विसर्जन अशाच प्रकारे सुव्यवस्थित रितीने संपन्न होण्यासाठी ०१ ते ०६ प्रभाग समिती कार्यालय क्षेत्रात सर्व यंत्रणा सुसज्ज असणार आहे. तरी शहरातील सर्व नागरिकांनी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनास यापुढेही पुढील श्रीगणेश विसर्जन वेळेस पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नेहमीच्या नियोजनात नसलेले रस्ते तसेच चौक देखील स्वच्छ करावेत : पालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़


कल्याण : स्वच्छता हीच सेवा या अभियानाच्या अनुषंगाने येत्या १५ दिवसांत नेहमीच्या नियोजनात नसलेले रस्ते तसेच चौक देखील स्वच्छ करावेत, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आज दिले. शासनाच्या निर्देशानुसार स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत दि. १८ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२४ या कालावधीत स्वच्छता ही सेवा अभियान २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात पुढील सूचना देण्यासाठी महापालिका आयुक्त दालनात आयोजिलेल्या





बैठकीत बोलताना पालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी हे निर्देश दिले.

या अभियानामध्ये सर्वांच्या सहभागाने स्वच्छता उपक्रम राबविणे, GVP POINTS निश्चित करुन त्यांचे स्वच्छ व सुंदर स्थळात रुपांतर करणेबाबत कार्यवाही करणे, सफाई मित्रांसाठी शासकीय योजनांचा लाभ देणे, या बाबींवर भर देण्यात येणार आहे. या अभियानाचा प्रारंभ दि. १८ सप्टेंबर २०२४ रोजी कल्याण (पश्चिम) येथील दुर्गाडी गणेश घाट येथे तसेच सर्व प्रभाग स्तरांवर श्रमदान करुन, स्वच्छतेची शपथ घेवून होणार आहे. या अभियानामध्ये अनेकविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत एक पेड माँ के नाम ही संकल्पना राबविली जाणार आहे. कल्याण-डोंबिवलीत भाजी मार्केट देखील या अभियानात संबंधितांकडून स्वच्छ करुन घेतली जाणार आहे. सफाई कर्मचा-यांचे आरोग्य तपासणी, CAPACITY BUILDING WORKSHOP, विसर्जन स्थळे स्वच्छ करणे, याच बरोबर नागरीकांशी स्वच्छता संवाद करणे, यामध्ये पदाधिकारी, एनजीओ यांचा देखील सहभाग घेतला जाणार आहे. स्वच्छतागृहांची निगा व स्वच्छता करणे, पंचतारांकित GARBAGE FREE SOCIETY स्पर्धेचे पुरस्कार वितरण, स्वच्छ प्रभाग, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक इत्यादींना पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम देखील आयोजित केला जाणार आहे.


# गणपती बाप्पा मोरय्या, मंगलमूर्ती मोरय्या


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय वर्षा बंगल्यावर गणरायाचे दर्शन घेताना आमदार रविंद्र फाटक सोबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे


आमदार रविंद्र फाटक यांच्या घरच्या श्री गणेशाचे दर्शन घेताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.


ठाणे महापालिका मा. नगरसेवक कृष्णा पाटील यांनी भाजपा महाराष्ट्र सचिव व मा. नगरसेवक संदीप लेले यांच्या घरातील गणरायाचे दर्शन घेतले.


शिवसेना टेंभी नाका शाखाप्रमुख, वैद्यकीय मदत कक्ष ठाणे जिल्हाप्रमुख निखिल सतिश बुडजडे यांच्या घरी गणरायाचे दर्शन घेताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.


ठामपा मा. नगरसेवक उमेश पाटील यांच्या घरातील श्रींचे दर्शन घेताना. खासदार नरेश म्हस्के व इतर मान्यवर


आमदार महेंद्र दळवी आपल्या राजमळा निवासस्थानी विराजमान गणरायाचे सहकुटुंब दर्शन घेताना.

## नवी मुंबई भाजपाचे राहुल गांधींविरोधात जळजळीत आंदोलन

### संविधानविरोधी भूमिकेचा निषेध



नवी मुंबई : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या संविधान विरोधी भूमिकेचा आज माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या आंदोलनामध्ये जळजळीत निषेध करण्यात आला.

नवी मुंबई भाजपा जिल्हा युवा मोर्चा आणि अनुसूचित जाती मोर्चा यांच्या वतीने हे आंदोलन ऐरोली येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारका जवळ करण्यात आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला नमन करून राहुल गांधी यांच्या आरक्षण विरोधी वक्तव्याचा धिक्कार करण्यात आला. जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष अमित मेढकर, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष राजेश शिंदे, स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या या आंदोलनामध्ये भाजपाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधानिक आरक्षण बंद पाडण्याचा राहुल गांधी यांचा डाव भाजपा हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा अमित मेढकर यांनी दिला. राहुल गांधी यांची संविधान विरोधी भूमिका पुन्हा एकदा जगासमोर आली असून त्यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणी राजेश शिंदे यांनी केली. राहुल गांधी यांनी माफी मागितली नाही तर यापेक्षाही उग्र आंदोलन केले जाईल असा इशारा नवीन गवते यांनी दिला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिन दुबळ्यांना दिलेले आरक्षण राहुल गांधी यांना संपवायचे आहे. त्यांचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, अशी टीका चंद्राम सोनकांबळे यांनी केली. तर राहुल गांधी यांच्या संविधान विरोधी वक्तव्यातून काँग्रेसचा खरा चेहरा समोर आल्याचे राजेंद्र इंगळे म्हणाले.

# उल्हासचे प्रदुषित पाणी मराठवाड्याला नेणार का ?

### पर्यावरणप्रेमींचा सवाल

### उल्हास, वैतरणाचे पाणी मराठवाड्यात नेण्याच्या निर्णयावर नाराजी

बदलापूर: उल्हास आणि वैतरणा उपखोऱ्यातील अतिरिक्त पाणी मराठवाडा प्रदेशातील गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी राज्य सरकारने ६१ कोटींना मंजूरी दिली आहे. मात्र आधीच प्रदुषणामुळेप् गटारगंगा होण्याच्या वाटेवर असलेल्या उल्हास नदीचे प्रदुषित पाणी मराठवाड्याला नेणार का असा संतप्त सवाल उल्हास नदी बचाव कृती समितीने उपस्थित केला आहे. आधी नदी प्रदुषण थांबवण्याची गरज असल्याचीही भावना पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

#### विरोध करणार

उल्हास खोऱ्यातून पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी सर्वेक्षण, पाहणी करणाऱ्या शासकीय अभ्यास गटाला उल्हास नदी आणि तिच्या उपनद्यांचे सांडपाणी पाठवून सरकारच्या या निर्णयाचा विरोध करणार असल्याची भूमिका उल्हास नदी बचाव कृती समितीने घेतली आहे.

पावसाळ्यात पुरस्थिती होऊ नये म्हणून असे निर्णय घेतले जात आहेत. मात्र गंगेचा किनार पुरामुळेच सुपीक झाला आहे. पुरामुळेच शेतजमीनी तयार झाल्या आहेत. आज मानवी अतिक्रमणामुळे पूर भयावह वाटतो आहे. पूर्वीच्या काळी दस्तऐवजांमध्येही पुरामुळे नुकसानीची नोंद आढळत नाही. त्यात सध्या एकाच वेळी सर्वच महाराष्ट्रातील नद्यांना पूर आला आहे.

**–अविनाश हरड**
**नद्यांचे अभ्यासक, अश्वमेध प्रतिष्ठान.**

■ पश्चिम वाहिनी खोऱ्यातील उल्हास नदी खोऱ्यातील ३४.८० टीएमसी तर वैतरणा खोऱ्यातून १९.९० टीएमसी असे एकूण ५४.७० टीएमसी अतिरिक्त पाणी वळविणे दुष्काळग्रस्त मराठवाडा प्रदेशातील गोदावरी खोऱ्यात वळवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी जलसंपदा विभागाने नुकताच शासन निर्णय जाहीर केला आहे. त्यासाठी ६१ कोटी ५२ लाखांच्या अंदाजपत्रकाला मान्यता दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास होणार आहे.

■ मात्र याच निर्णयावर बोट ठेवत उल्हास नदी बचाव कृती समितीने उल्हास नदीच्या प्रदुषणाच्या मुद्द्यावर लक्ष वेधले आहे. जागोजागी सांडपाणी, रसायन मिश्रित सांडपाणी नाले आणि ओढ्यांच्या माध्यमातून उल्हास नदीत दररोज मिसळत आहे. त्यातच नदी पात्रात आणि किनारी भागात अनाधिकृत बांधकामांमुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या नद्यांच्या प्रदुषणावर तोडगा काढण्यात अद्याप राज्य सरकारला यश आलेले नाही. त्यात दरवर्षी जलपर्णीच्या समस्येमुळे पाण्याची पातळी खालावते आहे.

■ पूर रेषा आणि ना बांधकाम क्षेत्रावरून शासन दरबारीच स्पष्टता नाही. अशा परिस्थितीत या प्रदुषित नदीचे पाणी मराठवाड्याला वळवण्याचे पाप करू नका, असे मत उल्हास नदी बचाव कृती समितीच्या सदस्यांनी व्यक्त केले आहे. समितीचे रविंद्र लिंगायत यांनी, गुरूवारी उल्हास आणि तिच्या उपनद्या प्रशासन तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाकर्ते पणामुळे वालधुनी नदीसारख्या मृत होत आहेत. याबाबत उल्हास नदी बचाव कृती समिती वारंवार शासनाला पाठपुरावा करत असतानाही परिस्थिती जैसे थे आहे, अशी माहिती दिली. त्यामुळे अशा प्रदुषित नदीचे पाणी मराठवाड्याला वळवण्यात सरकारला कसला आनंद वाटतोय, असाही प्रश्न आता पर्यावरणप्रेमी उपस्थित करत आहेत.

## नवी मुंबई पालिका अतिक्रमण विभागामार्फत ऐरोली विभागात तोडक कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई पालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सागरनाथ रामा मढवी, घर नं – ३०, मच्छी मार्केटच्या मागे, दिवा गाव, सेक्टर – ९ , ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१५९१/२०२३ च्या आदेशानुसार आज रोजी टेरेसचे बांधकाम अंशत: निष्कासीत करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सदर ठिकाणी पोकलेन, जेसीबी सारखी मशनरी जावु शकत नसल्याने या मोहिमेसाठी ७ हॅमर, ६ ब्रेकर, व १५ मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

### भिवंडी निजामपूर शहर पालिका वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत

## प्रौढ बीसीजी लसीकरण, आयुक्तांनी लस घेऊन केला शुभारंभ



भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत शांतीनगर येथे नवीन आपला दवाखानेचा उद्घाटन कार्यक्रम भिवंडी मनपा चे प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. दिनांक ०३.०९.२०२४ रोजी पासून प्रौढ बीसीजी लसीकरण सुरु हे प्रौढ बीसीजी लसीकरण हे १८ वय वरील मागील पाच वर्षात टीबी झालेली व्यक्ती, १ जानेवारी २०२१ पासून ढइ रुग्णांच्या संपर्कात असणारे व्यक्ती, ६० वर्ष वरील व्यक्ती, बॉडी मास इंडेक्स (१८ किलोग्रम/ मीटर स्केअर पेक्षा कमी असलेली व्यक्ती, सिगारेट किंवा बिडी घेणारे व्यक्ती, तसेच मधुमेह असणारे व्यक्ती यांना सदर लस देण्यात येत आहे. हे लस तीच लस आहे जी लहानपणी जन्मता मुलाला दिली जाते तरी ह्या लस पासून घाबरण्याची काही आवश्कता नाही.

भिवंडी मनपाच्या सर्व ना. आरोग्य केंद्रातर्गत जागोजागी कॅम्प (शिबीर) आयोजित करण्यात येत आहे, तरी सर्व नागरिकांनी लासिकरण मोहिमेत सहभाग होऊन पालिकेस सहकार्य करावे. असे आवाहन पालिका आयुक्त यांनी केले. आयुक्तांनी स्वतः लस घेऊन एक छान संदेश भिवंडी मनपाच्या नागरिकांना दिले. सदर कार्यकामास डॉ. बुशरा सय्यद शहर क्षयरोग अधिकारी, डॉ. जयवंत धुळे, डॉ. प्रिया फडके- मेडीकल ऑफिसर तथा एनटीईपीचे अनिल गुप्ता डीस्ट्रीक्ट कोर्डीनेटर, मोबीन शेख – एसटीएलएस आणि नागरी आरोग्य केंद्रातील मेडीकल ऑफिसर तथा कर्मचारी उपस्थित होते.

## जेएम फायनान्शियल सर्व्हिसेसची पहिलीवहिली शाखा ठाण्यात

ठाणे : भारतातील सर्वात प्रतिष्ठित वित्तीय सेवा कंपनी पैकी एक, जेएम फायनान्शियल सर्व्हिसेसने (जेएमएफएस) तिची पहिली शाखा ए/४१०, सेंट्रम बिझनेस स्केअर, वागळे इस्टेट, ठाणे येथे सुरू केल्याची घोषणा केली.गतिशील आणि वाढत्या गुंतवणूकदार समुदायासह, ठाणे हे वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक केंद्र म्हणून उदयास आले आहे. जेएम फायनान्शियल सर्व्हिसेसच्या ठाणे येथील नवीन शाखेचे उद्घाटन व्यवस्थापकीय संचालक आणि गुंतवणूक सल्लागार व वितरण विभागाचे सह–प्रमुख डिंपलकुमार शहा आणि व्यवस्थापकीय संचालक आणि इक्विटी ब्रोकिंग विभागाचे प्रमुख कृष्ण राव यांच्या हस्ते झाले. नवीन शाखा शेअर्स दलाली (इक्विटी ब्रोकिंग), संपत्ती व्यवस्थापन आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापन (पीएमएस) याद्वारे विविधांगी गुंतवणूक उपाययोजनांचे संपूर्ण दालन खुले करेल, ज्यामुळे शेअर्स, इक्विटी डेरिव्हेटिव्ह्ज, बाँड्स, म्युच्युअल फंड आणि विमा यासारख्या विविध प्रकारच्या मालमत्ता वर्गांमध्ये गुंतवणूकदारांना प्रवेश शक्य होईल



### गौरी–गणपती विसर्जनासाठी

## कृत्रिम तलावांकडे भाविकांचा ओघ

ठाणे : श्रीसह गौरी विसर्जनाच्या सहाव्या दिवशी ठाणे महापालिका क्षेत्रातील विसर्जनस्थळांवर एकूण १४३९९ गणेश मूर्ती तसेच ११४७ गौरी मूर्ती अशा एकूण १५५४६ मूर्तींचे सुव्यवस्थित नियोजनात विसर्जन संपन्न झाले. त्यात १०९ सार्वजनिक मंडळाच्या गणेश मूर्तीही होत्या. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची परंपरा यशस्वीपणे राबविणाऱ्या ठाणे महापालिकेच्यावतीने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांनी सहा दिवसांच्या गणेश मूर्तींचे व गौरी मूर्तींचे विसर्जन केले.

महापालिकेने तयार केलेल्या विसर्जन व्यवस्थेला ठाणेकर नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार मानले आहेत. प्रत्यक्ष विसर्जनाच्या ठिकाणी महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी पोलीस व स्वयंसेवकांच्या साथीने विसर्जन व्यवस्थेचे नियोजन केले.

## पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिली धामणकर नाका गणेशोत्सवास भेट

भिवंडी : पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी धामणकर नाका येथील गणेशोत्सव मित्र मंडळाला भेट दिली. धामणकर नाका मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी पालिका आयुक्त अजय वैद्य यांचे शाल, श्रीफळ व बुके देऊन सत्कार केला. पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते गरीब महिलांना शिवण मशीन वाटप करण्यात आली. पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी याप्रसंगी नमूद केले की, धामणकर नाका मित्र मंडळाचे सर्व उपक्रम हे कौतुकास्पद , अभिमानास्पद आहेत. भारतीय संस्कृती जपत असताना सामाजिक जाणीव दाखवणारे व राष्ट्रीय एकात्मतेचे देखावे या मंडळांनी अनेकवेळा साजरे केलेले आहेत. या मंडळाच्या देखाव्यातून सामाजिक जनजागृती, तसेच रक्तदान आरोग्य शिबिर, तपासणी इतर अन्य सामाजिक



उपक्रम यातून चांगल्या प्रकारे काम करीत असल्याचे दिसून येते. राज्य शासनाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव स्पर्धेत या मंडळाला चांगल्या प्रकारे मानांकन मिळावे व भिवंडीचे नाव देखील मोठे व्हावे अशी अपेक्षा देखील पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी याप्रसंगी व्यक्त केली. त्याच वेळेला राज्य शासनाच्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव क्षत्रिय निवड समिती परीक्षक देखील परीक्षणाकरता मंडळाच्या आवारात आले होते. नयना ससाणे उपायुक्त मुख्यालय तथा अध्यक्ष क्षेत्रीय समिती यांच्या अध्यक्षतेखाली परीक्षकांनी या मंडळाचे परीक्षण केले. याला पालिका उपायुक्त प्रणाली घोंगे, शहर अभियंता सचिन नाईक अन्य समितीचे सदस्य देखील उपस्थित होते. सर्व परीक्षक मंडळांचा यांचा सत्कार धामणकर नाका मित्र मंडळाच्या वतीने संतोष शेट्टी यांनी केला.

## जि. परिषदेचे बांधकाम विभागातील कामवाटप आता ऑनलाईन

ठाणे : जिल्हा परिषदे मार्फत सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांना बांधकाम विभागातील १० लाखाच्या आतील विकास काम विनास्पर्धा ऑनलाईन लॉटरी पद्धतीने बी. जे. हायस्कूल येथे (दि.१३ सप्टेंबर) आज वाटप करण्यात आले. सन २०२४–२५ या वर्षातील १६६ विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी तंत्रज्ञानाची जोड घेऊन आज विकास कामाचे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आले. यामार्फत काम वाटप आणि आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे करण्याच्या उद्देशाने कामकाज करण्यात आले आहे. पुढील कामवाटप नियोजन ऑनलाईन लॉटरी पद्धतीने फेसबुक, युट्यूब दूरदृश्यप्रणाली द्वारे देखील (लाईव्ह) करण्यात येईल. विकास कामांना गती मिळण्यासाठी सुरूवात उत्तम झाली असून काम देखील उत्तम पद्धतीने व्हावी अशी अपेक्षा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी व्यक्त केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विकास कामाचे वाटप ऑनलाईन लॉटरी पद्धतीने करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून कामवाटप, वेळेची बचत, पारदर्शकता आणण्यासाठी मोलाचं आहे. कामवाटप ऑनलाईन पद्धतीने राबवणारी महाराष्ट्रातील ७ वी जिल्हा परिषद असून पेमेंट गेटवे वापर करणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद ठाणे आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामांना गती मिळणार असून लॉटरी पद्धतीने काम मिळालेल्या सर्वांचे अभिनंदन, असे प्रास्ताविक करताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण, उप कार्यकारी अधिकारी सुनिल बच्छाव, आरेखक संजीव यशवंत, बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी, ठेकेदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापूर्वी हि प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने कामाच्या चिठ्ठया काढून लॉटरी पद्धतीन राबविण्यात येत होती. कामांचे विभाजन योग्य पध्दतीने करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून १ कोटी रक्कमेची काम ठेकेदाराने पुर्ण केल्यानंतर पुढील काम नवीन ठेकेदारास देण्यात येणार आहे. ekamwatapthanezp.in या संकेतस्थळावर विकास काम प्राप्त करण्यासाठी ८६६ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते.

पुर्वीची ऑफलाईन प्रक्रिया राबवितांना कागदपत्रांचा वापर जास्त प्रमाणत होत होता तसेच जमा झालेली रक्कम चलनाद्वारे बँकेत भरावी लागत होती. आता ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणारी कामवाटप प्रक्रियेत स्टेशनरीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार असून निविदा रक्कमेचा भरणा हा संबधित सुशिक्षित बेरोजगार अभियंता मजूर कामगार सहकारी संस्था यांच्या बँक खात्यातून ऑनलाईन पद्धतीने जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात जमा होणार आहे. तसेच ऑनलाईन सॉफ्टवेअर द्वारे विकास कामांचे वाटप झाले असून कामकाज वेगवान तंत्रज्ञान युक्त व पारदर्शक होणार आहे. यामुळे खऱ्या अर्थाने ठाणे जिल्हा परिषद हायटेक झालेली आहे अशी माहिती कार्यकारी अभियंता (बांधकाम) संदिप चव्हाण यांनी दिली.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771